सत्यमेव जयते

प्रधान मंत्री

**Prime Minister**

नवी दिल्ली<br>९ श्रावण, शक संवत् १९४५<br>३१ जुलै, २०२३

श्रीमती प्रिती दिलीपराव पोहेकर,

'परीक्षा पे चर्चा' चा एक भाग म्हणून तुमची आणि तुमच्या सहकाऱ्यांची मते जाणून घेता आली, याचे समाधान वाटले. त्याबद्दल मी तुमचे आभार व्यक्त करतो. देश आणि विद्यार्थ्यांचा विकास याबद्दलची तुमची मते अत्यंत महत्त्वाची आहेत.

शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या जीवनात दीपस्तंभासारखे मार्ग दाखवत असतात, त्यांना स्वप्न बघायला, त्या स्वप्नांचे संकल्पात रूपांतर करून त्यांची पूर्तता करायला शिकवतात. ते विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मकता आणि आत्मविश्वासाची भावना निर्माण करतात आणि त्यांना आयुष्यभर मार्गदर्शन करतात.

आजच्या बदलत्या काळानुसार तरुणांसाठी, खेळ, तंत्रज्ञान, नावीन्य आणि स्टार्टअप्ससह अनेक क्षेत्रातील पर्याय खुले झाले असून त्यामध्ये भरपूर संधीही आहेत. शिक्षकांचे अनमोल मार्गदर्शन विद्यार्थ्यांना त्यांची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी, त्यांच्या क्षमतेचा सर्वोत्तम वापर करून, भारताच्या विकासावर परिणाम होण्याच्या दृष्टीने प्रेरित करण्यात निर्णायक भूमिका बजावेल.

2047 पर्यंतच्या, आपल्यासाठी अमृत काळ असलेल्या कालखंडात, आपल्या प्रतिभावान तरुणांना गौरवशाली आणि विकसित भारत घडवण्याची संधी मिळाली आहे. मला विश्वास आहे की पुढील 25 वर्षांमध्ये आमचे शिक्षक तरुणांना त्यांचे ध्येय देशाच्या प्रगतीशी जोडण्यासाठी प्रेरित करतील.

तुमची मते मांडल्याबद्दल मी पुन्हा एकदा तुमचा आभारी आहे. तुमच्या उत्तम आरोग्यासाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा.

आपला,

(नरेंद्र मोदी)

Pariksha Pe Charcha 2023

MH-T-024468